MHAU030053042026

**<u>निशाणी क्रमांक ०१ वरिल आदेश</u>**

अर्जदार यांनी सदरचा अर्ज त्याची कार **होंडा सिटी कार जिचा नोंदणी क्र.एम.एच.–२०–ए.जी.–०३९० असुन तिचा चेसीस क्र. MAKGDS852H4N 112135 व इंजिन क्र. L15A30022701** चा ताबा मिळण्याकरिता केलेला आहे. अर्जदाराप्रमाणे ते वाहन गुन्हा क्र.**५९/२०२६** अंतर्गत, पोलीस स्टेशन सातारा यांच्या ताब्यात असुन अर्जदारानी मुद्देमाल त्यांच्या ताब्यात देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. तसेच, अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार हे सदर जप्त मुद्देमाल याचे मुळ मालक असुन त्यांनी त्यांच्या दैनंदिन कामासाठी आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

३. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने त्यांचे म्हणणे मांडले की, सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे व सदर गुन्हयात जप्त मुद्देमाल हा पुरावा भाग असुन तो नष्ट करु शकतो. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. तसेच, तपास अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, सदर गुन्हयामध्ये वाहनाच्या मालकीबाबत तपास चालु आहे. जप्त मुद्देमाल अर्जदारास परत केला तर तो इतर गुनहयामध्ये त्याचा वापर करु शकतो. तसेच, तपासात जप्त मुद्देमाल आवश्यक असल्यास तो हजर करण्याची शक्यता नाही. जप्त मुद्देमाल अर्जदारास परत करण्यास त्यांची काही हरकत नसल्याचे त्यांनी सांगितले.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. अर्जदाराने त्यांच्या म्हणण्याचे समर्थन करण्याकरीता मिळकती आर.सी.बुक ची प्रत, आधार कार्डची व एफ. आय. आर. ची प्रत इन्शुरन्स ची प्रत अभिलेखावर दाखल केला आहे. त्यावरुन अर्जदार हे सदर गाडीचे मुळ मालक असल्याचे दिसुन येते.

५. पुढे असेही की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने **<u>सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द स्टेट ऑफ गुजरात(२००२) १० एस.सी.सी.२८३</u>** मध्ये दिलेल्या दिशानिर्देशप्रमाणे मुद्देमाल

जास्त काळ पोलीस स्टेशन किंवा पोलीसांचे ताब्यात ठेवू नये. माझे मतानुसार सदर प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल मध्ये दिलेले दिशानिर्देश लागु होतात. पुढे असेही की, पोलीसांना जप्त मिळकतीची अत्यंत गरज नाही. असे लक्षात घेवुन अटी व शर्तीचे अधीन राहून जप्त मिळकत सुपुर्तनाम्यावर सोडणे न्यायोचित होईल. म्हणुन एकंदरीत परिस्थिती पाहता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करितो.

## आदेश

१. अर्ज अशंतः मंजुर करण्यात आला.

२. पोलीस स्टेशन सातारा यांनी अर्जदार **अजहर अल्ताफ कुरेशी** यांना जप्त केलेली कार **होंडा सिटी कार जिचा नोंदणी क्र.एम.एच.–२०–ए.जी.–०३९० असुन तिचा चेसीस क्र. MAKGDS852H4N 112135 व इंजिन क्र. L15A30022701**, रुपये १०,००,०००/- च्या सुर्पतनाम्या बॉण्डवर त्यांच्याताब्यात देण्यात यावी.

अ. अर्जदाराने सदरचा मुद्देमाल/कार न्यायालयाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणासही विकू नये व दुसऱ्या कोणाच्याही नावावर बदली करु नये.

ब. अर्जदाराने सदरच्या मुद्देमालाच्या रचनेत बदल करु नये व रंग बदलू नये.

क. पोलीस स्टेशन सातारा यांनी त्या मुद्देमालाचा तपशीलवार पंचनामा तयार करुन व अर्जदाराच्या खर्चाने मुद्देमालाचा चारी बाजूने फोटो काढून जप्त केलेली गाडी अर्जदाराच्या ताब्यात दयावी व फोटो न्यायालयात दाखल करावेत.

३. सदरहु आदेशाची प्रत गुन्हा क्र.५९/२०२६ सोबत जोडावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.03.12 16:10:44 +0530

औरंगाबाद
दि.१२/०३/२०२६.

( अ. वि. मुसळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,
न्यायालय क्र.०६, औरंगाबाद.

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order. | |
| Name of the Stenographer : | Smt. R. S. Dabhade |
| Court | J.M.F.C. Court No.06, Aurangabad |
| Date | 12/03/2026 |
| signed by the presiding officer on | 12/03/2026 |
| uploaded on | 12/03/2026 |